# जनसंपर्क विभाग

**जळगाव दि. १९ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात स्टार्ट अप इंडिया सप्ताह निमित्त इन्क्युबेशन सेंटरच्या वतीने दोन दिवशीय विद्यापीठात राऊंड टेबल कॉन्फरन्स १६ व १७ जानेवारी रोजी घेण्यात आली. उद्घाटन डॉ. राजेश जवळेकर (संचालक, इनोवेशन, इन्क्युबेशन व लिंकेजेस) यांच्या हस्ते करण्यात आले. सेंटरचे संचालक तथा समन्वयक प्रा. भूषण चौधरी, डॉ. विकास गीते, नितेश मल्होत्रा, व्यवस्थापक सागर पाटील यांची उपस्थिती होती .

नवउद्योजकता प्रत्येक घराघरात रुजवावी आणि खानदेशातील प्रत्येक विद्यार्थी आणि विद्यार्थिनीं रोजगार मागणारे नाही रोजगार देणारे बनावे; त्याचबरोबर महिलांनी सुद्धा मोठ्या संख्येने उद्योजकतेकडे वळावे असे आवाहन डॉ. जवळेकर यांनी केले. डॉ. विकास गीते यांनी उद्योगांमध्ये येणाऱ्या समस्या व त्याचे निराकरण कसे करावे व त्याच्या उपयोजना कशा असाव्यात याबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. भूषण चौधरी यांनी खान्देशातील ग्रामीण भागातील उद्योग हे जगात आपली वेगळी ओळख निर्माण करण्यामध्ये यशस्वी झाले आहे महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, व स्टार्टअप इंडिया सीड फंड स्कीम यांच्या माध्यमातून नव उद्योजकांना आर्थिक बाजू भक्कम होण्याकरिता पूर्णपणे मदत केली जात असून खानदेशातील विद्यार्थी हे जगभरात एक नवकल्पना घेऊन जात आहे व त्यांना त्यामध्ये यश प्राप्त होत आहे व त्यांनी आंतरराष्ट्रीय पारितोषिके पण स्पर्धेत जिंकले आहेत. त्याचबरोबर इन्क्युबेशनच्या माध्यमातून नवकल्पना केंद्रातील उद्योजकांना मार्गदर्शन दिले जात आहे असे सांगितले. याप्रसंगी श्री. राकेश कासार यांनी कंपनी ॲक्ट विषयीचे धोरण विविध योजनांच्या माहिती दिली व विधी सल्ला याबद्दलचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सीए हितेश आगीवाल व सीए हितेश जैन हे सुद्धा सहभागी झाले. सीए आगीवाल यांनी स्टार्टअप द्वारे आर्थिक नियोजन का व कसे असावे हे विविध उदाहरणांसह स्पष्ट केले.

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांनी पुढच्या पन्नास वर्षांमध्ये व्यवसायामध्ये करवायचे बदल व्यवसायामध्ये स्थिरता याबद्दल चे मार्गदर्शन केले. या राऊंड टेबल कॉन्फरन्स मध्ये खान्देशातुन जवळपास वीस पेक्षा अधिक जास्त नवउद्योजकांनी आपला सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे उद्योजकांचे उत्पादनाचा एक स्टॉल पण उभारण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केवल थोरात यांनी केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता देवेंद्र काळे, पवन शिंदे, संतोष भोई यांनी मदत केली.

**बातमी नं. २**

**जळगाव दि. १९ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्याच्या निमित्ताने 'स्त्री – पुरुषांचा भाषा व्यवहार व प्रभाव' समूहचर्चा सत्राचा कार्यक्रम घेण्यात आला.

समुह चर्चेत मराठी आणि इंग्रजी विषयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. त्यात इंग्रजी विभागाचे प्रा.डॉ. कृष्णा संदानशिव, प्रा. डॉ. सुदर्शन भवरे, संशोधक विद्यार्थी महेश सुर्यवंशी यांचा समावेश होता. अकाश कोंगळे, सुवर्णा कोळी, प्राजक्ता राजपूत या विद्यार्थ्यांनी देखील सहभाग घेतला.

शेवटी समूह चर्चेचे प्रमुख अतिथी मराठी विभाग प्रमुख प्रा.म.सु. पगारे यांनी स्त्री पुरूषांमधील वासनांधपणा तसेच हजारो वर्षापासून चालत आलेली पुरूषसत्ताक पध्दती, मानवतावादी सैध्दांतिक दृष्टीकोन या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. बाळासाहेब सूर्यवंशी यांनी आभार मानले तर समूहचर्चेचे सूत्र मराठी विभागातील प्रा. उज्वला लांडगे यांनी गुंफले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १९ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी